# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**बातमी -१**

जळगाव दि.०७ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेतील सुक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विभागप्रमुख व केसीआयआयएलचे संचालक प्रा. भूषण चौधरी यांना भारत सरकारच्या उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभागाकडून स्टार्टअप क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी बद्दलचा सन २०२१ चा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

हा पुरस्कार केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयुष गोयल यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे दि.३ जुलै रोजी देण्यात आला. महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्य विभागाच्या प्रधान सचिव मनीषा वर्मा, महाराष्ट्र राज्य नाविन्य सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंक कुशवाह यांच्या सह प्रा.भूषण चौधरी यांनी पुरस्कार स्वीकारला.

केंद्र शासनाच्या उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार मंत्रालयामार्फत मान्यता प्राप्त असलेल्या स्टार्टअप्समध्ये महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर आहे. देशातील एकूण ७२ हजार ७०२ मान्यता प्राप्त स्टार्टअप्स पैकी१३ हजार ४५० स्टार्टअप्स महाराष्ट्रातील आहेत.उत्तर महाराष्ट्र परिक्षेत्रात सध्या केवळ एक वर्षाच्या कालावधीत केसीआयआयएल तर्फे २० स्टार्टअप्स सुरु झाले आहेत तर अजुन १५ स्टार्टअप्स सुरु होण्याच्या मार्गावर आहेत. विद्यापीठातील केसीआयआयएल च्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उद्योजकीय कल्पनांना काही प्रमाणात निधी आणि बाजारपेठेसाठीचे योग्य मार्गदर्शन उपलब्ध् करुन दिले जात आहे. प्रा.भूषण चौधरी यांना प्राप्त झालेल्या या पुरस्काराबद्दल कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र- कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे,प्रभारी कुलसचिव प्रा.किशोर पवार, परीक्षा मुल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा. दीपक दलाल आदींनी अभिनंदन केले आहे.

**बातमी २**

जळगाव दि.०७ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे चालविण्यात येणाऱ्या डे-केअर सेंटर अंतर्गत ज्युनिअर व सिनीअर के.जी. च्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे स्वागत कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते गुरूवारी खाऊ देऊन करण्यात आले.

विद्यापीठाने सामाजिक बांधिलकीतून डे-केअर सेंटर विद्यापीठात सुरु केले आहे. या सेंटरसाठी विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात स्वतंत्र तरतूद करण्यात येते. गेल्या दोन वर्षांपासून कोरोना मुळे हे सेंटर बंद होते. आता ते नियमित सुरु झाले असून ज्युनिअर आणि सिनीअर के.जी.मध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. प्रत्येकी २५ विद्यार्थी क्षमता या वर्गांची आहे. या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या स्वागतासाठी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी हे स्वत: उपस्थित होते. या विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच केंद्रिय विद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, प्रभारी कुलसचिव प्रा. किशोर पवार, प्रा.एस.आर. चौधरी, डॉ. सुनील पाटील, शिक्षक मिनाक्षी पाटील, पुजा थोरात, प्रिती साजवाल, जी.एल. अहिरवार, धर्मेद्रसिंग, विद्या हिवराळे, नितीन आरसे, विवेक सहाने तसेच कर्मचारी अमृता महाजन, सुनिता जयकर आदी उपस्थित होते.

---

जा.क्र. : क.ब.चौ.उमवि/१६/हस्तदेय/२०२२ दि. : ७ जुलै, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमी आपल्या जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयाच्या दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी